# मुंबई विद्यापीठ

## ई-मासिक वार्तापत्र

डिसेंबर २०२४

वर्ष - ०३ • अंक १२



**नॅक द्वारा पुनर्मूल्यांकनामध्ये ३.६५ सीजीपीए सहित अ ++ श्रेणी**

**विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा**

# मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

## आसन क्रमांकासह परीक्षा केंद्रांची माहिती विद्यार्थ्यांना ऑनलाईन उपलब्ध

## ४३९ परीक्षा केंद्रावर १ लाख ३८ हजार विद्यार्थी देणार परीक्षा

मुंबई, दि. ३१ डिसेंबरः मुंबई विद्यापीठाच्या उन्हाळी सत्राच्या विविध विद्याशाखेअंतर्गत होणाऱ्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये पदवी स्तरावरील बीकॉम सत्र ६ ची परीक्षा १८ मार्च, बीएस्सी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च, बीए सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च २०२५ पासून सुरु होणार आहे. तर बीएस्सी आयटी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेअंतर्ग स्वयंअर्थसहाय्यित विषयांची परीक्षा १८ मार्च, बीएमएम आणि बीएएमएमसी सत्र ६ ची परीक्षा २६ मार्च २०२५ रोजी घेण्याचे विद्यापीठामार्फत नियोजित करण्यात आले आहे.

### १ लाख ३८ हजार विद्यार्थी देणार परीक्षाः

विद्याशाखानिहाय मानव्य विज्ञान शाखेसाठी १४७२३, वाणिज्य शाखेसाठी ७४४८३, विज्ञान २७१३४, तंत्रज्ञान १३००४, विधी ८७२५ असे एकूण १ लाख ३८ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यामध्ये ७५३४६ मुले, ६२७१७ आणि इतर ६ एवढ्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सातही जिल्ह्यातील एकूण ४३९ परीक्षा केंद्रांवर या परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

### डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून ३ महिन्यापूर्वीच विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र आणि आसन क्रमांकाची माहिती उपलब्ध

विशेष म्हणजे परीक्षा विभागाने विकसित केलेल्या डिजिटल प्रणालीच्या माध्यमातून डिजिटल युनिव्हर्सिटी पोर्टल (DU portal ) यावर ३ महिन्यापूर्वीच विद्यार्थ्यांना त्यांच्या आसन क्रमांकासह परीक्षा केंद्र आणि परिक्षेची माहिती ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना https://mum.digitaluniversity.ac/ à Know Your Exam Venue नुसार विद्यार्थ्यांना ही तंत्रस्नेही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून परीक्षा व निकाल विभागाचे उपकुलसचिव नरेंद्र खलाणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उन्हाळी सत्र २०२५ च्या परीक्षांचे सुक्ष्म नियोजन केले असल्याचे संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांचे विषय, आसन क्रमांक आणि अनुषंगिक तपशील याबाबतचे तात्पुरते प्रवेशपत्र महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असून, सर्व महाविद्यालयांनी या प्रवेशपत्रातील तपशील तपासून त्यातील काही दुरुस्ती असल्यास तात्काळ विद्यापीठाकडे संपर्क साधावा असेही त्यांनी सांगितले.

# दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेमध्ये मुंबई विद्यापीठास सुवर्ण आणि रौप्य पदकाचा बहुमान



दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेमध्ये सुवर्ण पदक विजेता दीपक पाटील



दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेमध्ये ब्रेस्टस्ट्रोक (महिला) प्रकारामध्ये रौप्य पदकाची मानकरी हिबा चौगुले

दिनांक २३ डिसेंबर: २१ ते २३ डिसेंबर २०२४ दरम्यान एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी कलावत्थुर चेन्नई येथे आयोजित केलेल्या दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धांमध्ये

मुंबई विद्यापीठास एक सुवर्ण आणि एक रौप्य पदकांचा बहुमान मिळाला. तांत्रिक दृष्ट्या अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या २०० मीटर ब्रेस्टस्ट्रोक ( पुरुष) या प्रकारामध्ये दीपक पाटील या खेळाडूला सुवर्ण पदक तर ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोक (महिला) या प्रकारामध्ये हिबा चौगुले या विद्यार्थिनीला रौप्य पदक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

भारतीय विद्यापीठे संघाच्या वतीने आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, केरळ आणि तामिळनाडू या राज्यातील एकूण ८० विद्यापीठे या स्पर्धेत सहभागी झाली होती. मुंबई विद्यापीठाच्या वतीने या स्पर्धेत ८ मुले आणि ३ मुली अशा एकूण ११ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. मुंबई विद्यापीठाच्या ११ खेळाडूंची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्विमिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेतील पारितोषिक विजेते आणि प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक प्रा. संकेत कुरणे यांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

## ड्रोन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात ज्ञान वृद्धीसाठी अभ्यासक्रम आणि संशोधन उपक्रम राबवावे मुंबई विद्यापीठात ड्रोन तंत्रज्ञान आणि उपयोग यावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा संपन्न

### ड्रोनच्या प्रदर्शनाने वेधले अनेकांचे लक्ष

दिनांक २१ डिसेंबर: आज मुंबई विद्यापीठात भूगोल विभाग, युएव्ही अकॅडमी प्रा. लि.आणि बॉम्बे जिओग्राफिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय ड्रोन तंत्रज्ञान आणि उपयोग यावरील कार्यशाळेचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी आणि राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख नवल बजाज (भापोसे) यांच्यासमवेत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेला मार्गदर्शन करताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी भूगोल विभागाने नामांकित राष्ट्रीय संस्था आणि खाजगी क्षेत्राच्या माध्यमातून ड्रोन आधारित अभ्यासक्रम आणि संशोधन उपक्रम हाती घ्यावेत, तसेच विविध विषयांच्या विभागाच्या सहयोगाने ज्ञान वृद्धी आणि इंटर्नशिपचा फायदा विद्यार्थ्यांना करून द्यावा असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नवल बजाज यांनी आपल्या भाषणात मुंबई मधील गणपती उत्सव विसर्जन मिरवणूक नियंत्रण करण्यासाठी पहिल्यांदा ड्रोनचा वापर केला गेला असल्याचे सांगत, ड्रोन चालकास आपल्या कौशल्याने विविध दुर्घटनांवर नियंत्रण करता येत असल्याचे हे कोविड काळात प्रकर्षाने दिसून आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दहशतवाद, हवामान बदल, आणि नैसर्गिक आपत्ती यावर ड्रोनच्या सहाय्याने नियंत्रण करण्यासाठी सहाय्यक ठरत असल्याचे सांगून त्यांनी ड्रोनचा व्यापक वापर आणि सुरक्षेच्या दृष्टीने वाढती आव्हाने यावर उपस्थिताना मार्गदर्शन केले. आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी ड्रोन तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला. प्रा.नरेंद्र शहा यांचे ड्रोनचे महत्व, शासकीय दृष्टीकोन आणि भविष्य या विषयावर केलेले सखोल मार्गदर्शन आकर्षणाचे केंद्र ठरले.

ड्रोनचे विविध उपयोग, ड्रोन क्षेत्राचे भवितव्य, रोजगाराच्या संधी, ड्रोन क्षेत्रातील समस्या आणि उपाय याविषयी डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. किरण नाईक आणि श्रुती सुरेंद्रन यांनी कार्यशाळेत सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला यूएव्ही अकादमीचे संचालक आणि सीईओ डॉ. किरण नाईक, सीटीओचे प्रणव राऊत आणि सुरेशबाबू उपस्थित होते.

या कार्यशाळेचा भाग म्हणून यूएव्ही अकादमीच्या माध्यमातून ६ विविध प्रकारच्या यूएव्ही, कमांड आणि कंट्रोल सेंटर्सचे प्रदर्शन भरविण्यात आले. यामध्ये संपती नावाची २० फूट लांबीची यूएव्ही मुख्य आकर्षणाची केंद्र ठरली. या कार्यशाळेत मुंबई विदयापीठातील संलग्न महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर आणि शंशोधन करणारे असे एकूण १९० विद्यार्थी उपस्थित झाले होते व त्यांनी खुल्या परिसंवादात भाग घेऊन ड्रोनचे उपयोग समजून घेतले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. संजुक्ता सत्तार आणि डॉ. रमेश गावित यांनी केले तर डॉ. प्रविण कोकणे यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.

## मुंबई विद्यापीठास मुलींच्या खो-खो स्पर्धेत अजिंक्यपद

## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठाची चमू ठरली पात्र



अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेत (मुली) अजिंक्यपद पटकावणारी चमू

दिनांक १९ डिसेंबरः १६ ते १९ डिसेंबर २०२४ दरम्यान गोविंद गुरू जनजातिय विद्यापीठ बाँसवाडा राजस्थान येथे झालेल्या पश्चिम विभागीय मुलींच्या खो-खो स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठाच्या मुलींच्या खो-खो संघाने अजिंक्यपद पटकावून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. भारतीय विद्यापीठ संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, गोवा या राज्यातील ७२ विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठ मुलींच्या खो-खो संघाने उपांत्यपूर्व फेरीमध्ये (क्वार्टर फायनल) गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचा २४ गुणांनी पराभव करत मुंबई विद्यापीठ चमू अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. तर साखळी स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर यांचा ८ गुणांनी पराभव केला, तसेच व्ही. एन. यू. डी. विद्यापीठ गुजरातचा १ डाव ३ गुणांनी पराभव केला तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे संघाचा २ गुणांनी पराभव करून या स्पर्धेत अजिंक्य पद मिळवले.

मुंबई विद्यापीठाच्या या संघामध्ये गीतांजली नरसाळे, साक्षी तोरणे, पूजा फरगडे, किशोरी मोकाशी, अपर्णा खंडागळे, सानवी तळवडेकर, दिव्या गायकवाड, रोशनी जूनगरे, श्वेता जाधव, पायल पवार, श्रिया नाईक, श्रेया सनगरे, साक्षी डफाळे, काजल शेख, कल्याणी कंक या खेळाडूंचा सहभाग होता. संघाला प्रशिक्षक म्हणून पंकज चव्हांडे आणि संघ व्यवस्थापक म्हणून रोहिणी डोंबे यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी या चमूचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

## विद्यार्थी संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण

### विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यावर भर

मुंबई, दि. १७ डिसेंबरः मुंबई विद्यापीठाने सुरु केलेल्या विद्यार्थी संवाद उपक्रमाच्या माध्यमातून आज परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक समस्यांचे जलदगतीने निपटारा करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ डॉ. पूजा रौंदळे यांनी आज या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थित सर्व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यात आले. आज उपस्थित विद्यार्थ्यांनी राखीव निकाल, गुणपत्रिका, आणि पात्रता असे अनुषंगिक प्रश्न उपस्थित केले. या सर्व तक्रारींचे निवारण विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. काही विद्यार्थ्यांस तात्काळ गुणपत्रिका देण्यात आली. या उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले.

मुंबई विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व अनुषंगिक बाबींशी निगडीत प्रश्न, शंका, समस्या यांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठात विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता पात्रता व नावनोंदणी, निकाल, गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र यासह परीक्षा विभागाशी निगडीत प्रश्नांचे आणि तक्रारींचे प्राथम्याने निरसन करण्यासाठी महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या मंगळवारी विद्यापीठात विद्यार्थी संवाद उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमातील पुढील संवाद २७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० ते ५.०० वाजेदरम्यान मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकुलातील छत्रपती शिवाजी महाराज भवन (नवीन परीक्षा भवन) येथे करण्यात आले आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांचे ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य असेल.

# मुंबई विद्यापीठाची चमू ठरली अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र
## महिला फुटबॉल संघ करणार मुंबई विद्यापीठाचे नेतृत्व




अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरलेली मुंबई विद्यापीठाची महिला फुटबॉल चमू

दिनांक १६ डिसेंबरः ७ ते ११ डिसेंबर २०२४ दरम्यान वर्धमान महावीर मुक्त विद्यापीठ कोटा राजस्थान येथे झालेल्या पश्चिम विभागीय महिला फुटबॉल स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने दर्जेदार कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठाचा महिला फुटबॉल संघ अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला असून ही चमू मुंबई विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहे. भारतीय विद्यापीठ संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महिला फुटबॉल स्पर्धेत मुंबई विद्यापीठ महिला फुटबॉल संघाने एम. एल. एस विद्यापीठ उदयपुर यांना ६-० ने हरवून अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. या स्पर्धेत ४५ विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते.

मुंबई विद्यापीठाच्या या संघामध्ये फ्लोरिण परेरा, प्रणाली भोसले, शिखा राणी भकत, ग्लिनेल पिकार्डो, रिद्धी मेहरा, बुशरा शेख, रियान डिकोना, पूजा राजपूत, टिया परेरा, समीक्षा अहिरेकर, पारुल कासवान, नमिक्षा शेट्टी, कोमल मसुरकर, भौमी नारकर, निती लाधा, इसाबेल गॅब्रिएल डिसूझा, किआरा पिंटो, एंजेलिना सिक्वेरा, लाएल रेगो या खेळाडूंचा सहभाग होता. संघाला प्रशिक्षक म्हणून शरविन चांग आणि संघ व्यवस्थापक म्हणून लॉरेन्स नादर यांचे मार्गदर्शन लाभले. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी या चमूचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी यांचे मार्गदर्शन लाभले.

# मुंबई विद्यापीठाने वाढवली बहुविद्याशाखीय ओपन इलेक्टिव्हची व्याप्ती
## चारही विद्याशाखेतील ज्ञानाचे भांडार खुले, कार्यांतर्गत प्रशिक्षणासाठी नाविन्यपूर्ण क्षेत्राची निवड

मुंबई, दि. १६ डिसेंबरः राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठात विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रविष्ठ असलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानाचे भांडार खुले करण्यात आले आहे. विद्यापीठाने

बहुविद्याशाखीय ओपन इलेक्टिव्हची व्याप्ती वाढवली असून ही संख्या आता शंभराच्या पुढे गेली आहे. नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत विविध विद्याशाखेतील ओपन इलेक्टिव्हसना मान्यता देण्यात आली. यामध्ये फ्रेंच लँग्वेज अँड कल्चर फॉर हॉस्पिटॅलिटी, एथिक्स अँड एटिकेट्स इन डिजिटल टेक्नॉलॉजी, सायबर सिक्युरिटी, युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यूस्, योगा फॉर हेल्थ अँड वेलनेस, एपिग्राफी, बेसिक एस्ट्रोनॉमी, केस स्टडीस इन मॅनेजमेंट, मार्केटिंग मिक्स – I, लीडरशिप मॅनेजमेंट, मार्केटिंग मिक्स – II, इंडस्ट्री ४.०, एथिक्स अँड एटीकेट्स इन डिजिटल टेकनॉलॉजी, वेब डेव्हलपमेंट, डिजिटल करन्सी अँड ब्लॉक चेन टेक्नोलॉजी , सायबर सिक्युरिटी, आणि सिव्हिल इंजिनीअरिंग अँड इन्फ्रास्ट्रक्चर एसेंशिअल अशा दोन २ क्रेडिटच्या ओपन इलेक्टिव्हसची बास्केट उपलब्ध करून देण्यात आली आहे.

त्याचबरोबर नॅनो सायन्स आणि नॅनो टेक्नोलॉजी विभागामार्फत विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेतील अद्ययावत तंत्रज्ञान आणि उपकरणे याबाबत प्रत्यक्ष ज्ञान मिळावे यासाठी नाविन्यपूर्ण कार्यांतर्गत प्रशिक्षण क्षेत्र निर्माण केली आहेत. ज्यामध्ये सर्टिफिकेट कोर्स इन स्पेक्ट्रोस्कोपिक (यूव्ही-वीआयएस, आयआर अँड रामन), सर्टिफिकेट कोर्स इन आरटी -पीसीआर, मायक्रोस्कॉपिक टेकनिक्स (एसइएम, टीइएम, एएफएम अँड एसटीएम), क्रोमॅटोग्राफीक टेकनिक्स (जीसी अँड एचपीएलसी) अशा क्षेत्रांचा समावेश असल्याचा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

**एमएमएस पदव्युत्तर अभ्यासक्रमांस लॅटरल एन्ट्रीने प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ब्रिज कोर्सः**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अभियांत्रिकी पदवीधारकांना एमएमएस या दोन वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाच्या थेट प्रवेशासाठी अभ्यास मंडळाने तयार केलेल्या ब्रिज कोर्सेसना विद्या परिषदेची मंजूरी मिळाली आहे. यामध्ये फंडामेंटल्स ऑफ मॅनेजमेंट थेअरी अँड प्रॅक्टीस, फायन्साशिअल अकाऊंटीग फॉर बिझनेस, फंडामेंटल्स ऑफ मार्केटिंग, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, कॉर्पोरेट फायनान्स, ह्युमन रिसॉर्स मॅनेजमेंट आणि इन्फॉर्मेशन सिस्टम अँड डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन या विषयांचा समावेश आहे.

## मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडणूक / नामनिर्देशनाचे निकाल जाहीर व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, स्थायी समिती आणि अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवर अधिसभेतून निवड

मुंबई, दि. १५ डिसेंबरः महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदींनुसार मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, स्थायी समिती आणि अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवरील निवडणूक/नामनिर्देशाचे निकाल आज पार पडलेल्या विशेष अधिसभेच्या बैठकीत जाहीर करण्यात आले. यानुसार व्यवस्थापन परिषदेवर प्राचार्य गटातून प्रा. दिलीप भारमल (खुला प्रवर्ग) आणि प्रा. दिलीप पाटील (इतर मागासवर्ग प्रवर्ग) यांची बिनविरोध निवड झाली. तर अध्यापक गटातून झालेल्या एकूण ६९ मतदानातून

डॉ. अनुप पळसोकर ( खुला प्रवर्ग) हे ५१ मतांनी निवडून आले. तर डॉ. जगन्नाथ खेमनर (विमुक्त जाती प्रवर्ग) हे बिनविरोध निवडून आले. व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून सुनील जोशी (खुला प्रवर्ग) बिनविरोध निवडून आले. नोंदणीकृत पदवीधर गटातून मिलिंद साटम (खुला प्रवर्ग) आणि शितल शेठ (अनुसूचित जाती प्रर्वग) यांची बिनविरोध निवड झाली.

विद्यापरिषदेवर व्यवस्थापन प्रतिनिधी गटातून रविंद्र घोडविंदे यांची बिनविरोध निवड झाली. स्थायी समिती या प्राधिकरणावर प्राचार्य गटातून प्रा. वसंत माळी आणि नोंदणीकृत पदवीधर गटातून प्रदीप सावंत यांची बिनविरोध निवड झाली. तर अध्यापक गटातून स्थायी समितीवर डॉ. अनूप पळसोकर हे ४७ मतांनी निवडून आले. अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीवर अध्यापक गटातून डॉ. विनोद कुमरे हे ४८ मतांनी निवडून आले तर अध्यापकेत्तर कर्मचारी गटातून संतोष निकम यांची बिनविरोध निवड झाली.

मुंबई विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर निवडून/ नामनिर्देशाने आलेल्या सर्व मान्यवर सदस्यांचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे आणि कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांनी स्वागत करून अभिनंदन केले. या निवडणूकीच्या कामी उपकुलसचिव (निवडणूक) विकास डवरे, सहाय्यक कुलसचिव रमेश दामसे आणि त्यांच्या चमूने अथक प्रयत्न घेतले. आज पार पडलेल्या निवडणूकीसाठी डॉ. विनोद पाटील, कुलसचिव, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे विशेष सहाय्य लाभले.

## मुंबई विद्यापीठात बहुविद्याशाखीय शिक्षणाचे दालन खुले

## दुहेरी पदवी, सह पदवी आणि ट्विनींग पदवीच्या शिक्षणासाठी विद्या परिषदेची मंजूरी

## प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या नियुक्तीस मान्यता

मुंबई, दि. १३ डिसेंबरः राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या धर्तीवर आणि आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बहुविद्याशाखीय शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध संधीचे दालन खुले करण्यासाठी मुंबई विद्यापीठात आता दुहेरी पदवी, सह पदवी आणि ट्विनींग पदवीच्या शिक्षणासाठी विद्या परिषदेने मंजुरी दिली आहे. यानुसार आता विद्यार्थ्यांना विविध विद्याशाखेतील आणि ज्ञानक्षेत्रातील ज्ञानार्जनाच्या संधी उपलब्ध होतील.

दुहेरी पदवीच्या शिक्षणाअंतर्गत आता विद्यार्थ्यांला दोन महाविद्यालये किंवा दोन उच्च शिक्षण संस्थामध्ये एकत्र प्रवेश घेता येणार असून त्यास शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर दोन पदव्या मिळणार आहेत. दुहेरी पदवीच्या शिक्षणक्रमाअंतर्गत दोन्ही पदव्या डिस्टन्स/ऑनलाइन मोडमध्ये किंवा एका प्रत्यक्ष आणि एका डिस्टन्स मोडमध्ये दिली जाऊ शकते. याव्यतिरिक्त, या तरतुदीअंतर्गत दोन्ही डिग्री आता प्रत्यक्ष मोडमध्ये एकाच वेळी घेतल्या जाऊ

शकतील. परंतु यासाठी सहभागी महाविद्यालयांनी विद्यापीठाची रितसर अनुमती घेऊन व शैक्षणिक सामंजस्य करार करणे गरजेचे राहणार आहे. तसेच दुहेरी पदवीच्या शिक्षणक्रमाअंतर्गत सहभागी संस्था/विद्यापीठांनी क्रेडिट्स किंवा कोर्सेसची ओव्हरलॅपिंग होणार नाही याची याची खात्री करणे आवश्यक राहील, त्याचबरोबर प्रत्यक्ष मोडमध्ये दुहेरी पदवीच्या शिक्षणासाठी दोन्ही संस्थांमधील अंतर हे एकमेकांपासून ५-२० कि.मी.च्या अंतरावर असावे लागणार आहे.

तर सह पदवी आणि ट्विनिंग पदवीच्या शिक्षणक्रमाअंतर्गत मुंबई विद्यापीठातील विविध विभाग आणि सलंग्न महाविद्यालये इतर उच्च शिक्षण संस्था किंवा आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी शैक्षणिक सामंजस्य करार करु शकतील. परंतू असे शैक्षणिक करार करताना त्या शैक्षणिक संस्था क्युएस टॉप १०००/एनआयआरएफ टॉप १००/ किवा नॅकची 'ए' श्रेणी असेल याची खात्री करावी लागेल. तसेच यासाठी विद्यापीठाची परवानगी घेणे बंधनकारक असेल. मुंबई विद्यापीठाने उच्च शिक्षणाच्या आंतरराष्ट्रीयकरणाच्या दिशेने पाऊल टाकत सह पदवीच्या शिक्षणासाठी सेंट लुईस आणि मॉस्को स्टेट विद्यापीठांशी शैक्षणिक सामंजस्य करार केले आहेत तर ट्विनिंग डिग्रीसाठी फ्रान्स आणि इटली येथील विद्यापीठांशी करार केलेले असून अनेक आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठांशी करारांची प्रक्रिया सुरु असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. या बहुविद्याशाखीय शिक्षणक्रमांना प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क आणि अनुषंगिक बाबींची माहिती ही सुरुवातीलाच कळविली जावी असेही त्यांनी सांगितले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने बहुविद्याशाखीय शिक्षणामुळे दोन उच्च शिक्षण संस्थांमधील प्रगत ज्ञानशाखेचे सखोल अध्ययन व संशोधन तसेच ज्ञानाच्या देवाणघेवाण प्रक्रियेमुळे शिक्षण प्रणालींमध्ये मोठा बदल पाहावयास मिळणार असून सर्वोत्कृष्ट शैक्षणिक पद्धतींच्या सामायिकरणास यामुळे प्रोत्साहन मिळू शकेल असेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

### प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या पदांच्या नियुक्तीस मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या पदांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार विद्यापीठात प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसच्या पदांच्या नियुक्तीस विद्यापरिषदेनी मान्यता दिली आहे. समितीच्या शिफारशीनुसार हे पद भरताना उदयोन्मुख क्षेत्रातील गरजा लक्षात घेऊन तसेच विद्यापीठ विभागानी उद्योग जगतातील आवश्यक गरजा आणि क्षेत्र ओळखून हे पद भरण्याची शिफारस करण्यात आली आहे, तसेच एआयसीटीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे अवलंबन आणि धोरणाचे वार्षिक पुनरावलोकन करण्यात यावे अशीही शिफारस समितीने केली आहे.

# प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे सादर न करणाऱ्या महाविद्यालयांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध

## १ महिन्यात कागदपत्रे सादर न केल्यास पुढील वर्षीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी परवानगी नाकारली जाणार

## विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानाची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची

मुंबई, दि. १० डिसेंबरः मुंबई विद्यापीठाशी संलग्नित विविध महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त शिक्षण संस्थांमध्ये विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता आणि नावनोंदणी संबंधातील आवश्यक कागदपत्रे ८ दिवसात विहित शूल्कासह विद्यापीठाकडे जमा करण्याचे आवाहन मुंबई विद्यापीठामार्फत करण्यात आले होते. ही मुदत संपल्यानंतर विद्यापीठाने ज्या महाविद्यालयांनी विहित मूदतीत प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे सादर केली नाहीत अशा महाविद्यालयांची यादी मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. या यादीमध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२२-२३ अशा चार वर्षात ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे सादर केली नाहीत अशा महाविद्यालयांचा समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांना पुन्हा एकदा १ महिन्याची मूदत देण्यात आली आहे. सदर मूदतीत जी महाविद्यालये प्रवेश प्रक्रिये संदर्भात आवश्यक कागदपत्रे शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द केले जाणार असून अश्या महाविद्यालयांना पुढील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यास परवानगी नाकारण्यात येणार असून याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची असणार असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठामार्फत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियेची कागदपत्रे विहित मुदतीत जमा करण्यासाठी परिपत्रानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते. प्रथम वर्षात प्रवेश घेतल्यानंतर त्याची नाव नोंदणी व पात्रता बाबतचे दस्तऐवज त्याच वर्षात जमा करणे आवश्यक असतानाही अनेक महाविद्यालयांमार्फत विहित मुदतीत कागदपत्रे सादर केली जात नाहीत. शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१,२०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षात विविध अभ्यासक्रमांना प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांचे पात्रतेसंबंधीत अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. अशा प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी विद्यापीठामार्फत सुरुवातीला १५ फेब्रुवारी २०२४ या तारखेपर्यंत विहित शूल्कासह कागदपत्रे जमा करण्यासाठी कळविण्यात आले होते. त्यानंतर ३० सप्टेंबर २०२४ ही मुदतवाढ देण्यात आली होती. ३० सप्टेंबर २०२४ ही शूल्कासह कागदपत्रे जमा करण्याची अंतिम मूदत उलटूनही अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भातील कागदपत्रे अद्याप विद्यापीठाकडे जमा केलेली नाहीत. विहीत मुदतीत जमा न केलेल्या कागदपत्रांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे निकाल

राखीव ठेवले जातात, पर्यायाने पुढील शिक्षण आणि नोकरीच्या संधीमध्ये संभाव्य बाधा निर्माण होत असतात. त्यामुळे व्यापक विद्यार्थी हित लक्षात घेता विद्यापीठामार्फत ८ दिवसाची मूदतवाढ देण्यात आली होती.

**वर्षनिहाय आकडेवारी**

२०१९-२० -- १४४४२

२०२०-२१-- १२२८१

२०२१-२२-- २२९००

२०२२-२३--४७६१०

## मुंबई विद्यापीठात भारतीय भाषा संवर्धन व प्रसार केंद्राची स्थापना

मुंबई, दि. ०९ डिसेंबरः भाषा या आपल्या संस्कृती, वारसा आणि ज्ञानाच्या वाहक आहेत त्यामुळे भारतीय भाषा लोकमानसात कायम प्रभावी राहाव्यात तसेच संशोधन व प्रसार या प्रयत्नातून चिरंजीवी राहाव्या यासाठी मुंबई विद्यापीठात भारतीय भाषा संवर्धन व प्रसार केंद्राची स्थापना केली जात आहे. विद्यापीठाच्या विविध विभागातील मराठी, हिंदी, संस्कृत, गुजराती, कन्नड, सिंधी, पाली, प्राकृत, उर्दू आणि अवेस्ता पहलवी अशा भाषांसह घटनेत अनुसूचित असलेल्या २२ भाषांचा यात समावेश असेल. नुकत्याच पार पडलेल्या विद्या परिषदेत या अनुषंगाने ठराव करण्यात आला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या भारतीय भाषा संवर्धन समितीच्या अनुषंगाने उच्च शिक्षणात भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी या केंद्राचे महत्व अधोरेखित होणार आहे.

भारतात बोलल्या जाणाऱ्या विविध भाषा, त्यावरील अध्ययन आणि संशोधन तसेच भाषिक विविधता ही देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा समजला जातो. अनेक भारतीय भाषांना समृद्ध साहित्यिक परंपरा आणि अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. या विविध भाषेतील दर्जेदार साहित्यकृती इतर भाषेत भाषांतरित करणे, प्रादेशिक भाषेतील ज्ञान संपत्तीची वृद्धी करणे, विविध भाषेत साहित्य तयार करणे त्याचबरोबर भारतीय भाषांमध्ये भाषांतर आणि शैक्षणिक लेखनाद्वारे अभ्यास सामग्री वाढवणे आणि मूळ पुस्तक लेखनासाठी परिसंस्था निर्माण करणे यासाठी या केंद्राचे महत्व अधोरेखित होणार असल्याचे मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले. विशेष म्हणजे अभिजात मराठी भाषेतील दर्जेदार साहित्यकृती इतर भाषेत भाषांतरित करणे, इतर भाषांतील उत्तमोत्तम साहित्य मराठी भाषेत भाषांतरित करणे, त्याचबरोबर बोलीभाषांना संगणकीय सहाय्याच्या माध्यमातून वृद्धींगत करणे असे अनुषंगिक उपक्रम या केंद्राच्या माध्यमातून राबविले जाणार आहेत.

उच्च शिक्षणातील विविध विषयांमध्ये भारतीय भाषांमध्ये अनुवाद, भारतीय भाषेतील पुस्तक लेखनाला चालना देण्यासाठी नोडल विद्यापीठे निश्चित करण्यात आली असून सिंधी भाषेसाठी मुंबई विद्यापीठ नोडल विद्यापीठ म्हणून काम पाहणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून शैक्षणिक लेखन आणि अनुवादाला प्रोत्साहन दिले जाणार असून त्याचबरोबर इतर भाषेतील शैक्षणिक साहित्य प्रादेशिक भाषेत भाषांतरित करून विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. या

केंद्राच्या माध्यमातून विविध भारतीय भाषांचे संवर्धन व प्रसार करण्यासाठी विशेष कार्यक्रम आणि संशोधन प्रकल्प राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर अधिकारी-कर्मचारी व बृहद समाज यांना भाषेशी जोडण्याचे कार्य या केंद्राच्या माध्यमातून केले जाणार असल्याचेही कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी सांगितले.

## पेट परीक्षेचा निकाल जाहीर

मुंबई, दि. ०७ डिसेंबर: मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या पी.एच.डी. प्रवेश पूर्व परीक्षा (पेट) २०२४ चा निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. सेंटर बेस्ड टेस्ट ( सीबीटी) ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी एकूण ५०४० एवढ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर केले होते. त्यापैकी एकूण ३७९४ एवढे विद्यार्थी या परीक्षेला उपस्थित होते. यापैकी या परीक्षेत एकूण २००८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत ( उत्तीर्णतेचे प्रमाण ५३ % आहे )परीक्षेचा निकाल मुंबई विद्यापीठाच्या mu.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या ईमेल लॉगिन मध्ये या परीक्षेचे प्रमाण पत्र लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना मिळणारे प्रमाणपत्र हे विशेष फीचर क्यूआर कोडयुक्त असून ऑनलाइन पडताळणीसाठी उपयुक्त ठरणार आहे. दिनांक १७ आणि २४ नोव्हेंबर २०२४ रोजी विविध केंद्रावर या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्याशाखानिहाय या परीक्षेसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्या शाखेसाठी सर्वाधिक ९२१ , वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेसाठी ४४६ , मानव्यविद्या शाखेसाठी २७५ आणि आंतर विद्याशाखेसाठी ३६६ एवढे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## मुंबई विद्यापीठात स्टार्टअप मंथन १.० च्या माध्यमातून नव उद्योजकतेला चालना

### संज्ञापन व पत्रकारिता विभागात युवा उद्योजकतेला चालना देण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

मुंबई, दि. ०४ डिसेंबर: मुंबई विद्यापीठाच्या संज्ञापन व पत्रकारिता विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधील नव उद्योजकतेला चालना देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्टार्ट-अप बाबत व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या 'एमयू आयडीयाज फाउंडेशन इन्क्युबेशन सेंटर' च्या सहकार्याने स्टार्टअप मंथन १.० च्या माध्यमातून एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या एक दिवसीय कार्यशाळेला विभागप्रमुख डॉ. सुंदर राजदीप, संचालक नवोपक्रम नवसंशोधन आणि साहचर्य मंडळाचे डॉ. सचिन लढ्ढा, गरवारे व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेचे संचालक डॉ. केयुरकुमार नायक, इन्स्टिट्यूट फॉर द डिझाईन ऑफ इलेक्ट्रिकल मेझरिंग




मुंबई विद्यापीठात स्टार्टअप मंथन १.० च्या कार्यक्रमासाठी उपस्थित मार्गदर्शक आणि विद्यार्थी

इन्स्ट्रुमेंट्सचे आयुष रायसोनी यांच्यासह विविध शैक्षणिक क्षेत्रांतील विद्यार्थी, संशोधक, शिक्षक आणि उद्योजक उपस्थित होते.

या कार्यशाळेत संज्ञापन व पत्रकारिता विभागातील नवप्रतिभावंतांच्या नव संकल्पनाना मूर्त रुप देण्यासाठी आणि नव उद्योजकतेला चालना तसेच विद्यापीठाच्या एमयू आयडीयाज फाउंडेशन इन्क्युबेशन सेंटर'च्या माध्यमातून स्टार्टअप मध्ये रुपांतर करण्यासाठी डॉ. सचिन लढ्ढा यांनी मार्गदर्शन केले. आयुष रायसोनी यांनी 'एआय पॉवर्ड फिल्ममेकिंग' या विषयावर मार्गदर्शन केले. तर डिजीटल मीडियाच्या वापरातून एखाद्या उद्योग समूहाच्या वितरकामार्फत थेट माल विविध व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना पुरविता येऊ शकत असल्याची संकल्पना डॉ. केयूर कुमार नायक यांनी मांडली. तसेच त्यासाठी शून्य पैशाची गुंतवणूक लागत असून त्यातून स्वत:चे जाळे पसरवून मोठा उद्योग उभा करु शकत असल्याचे त्यांनी सांगितले. विभागातील माजी विद्यार्थी युक्ती मीडिया कन्सल्टन्सीचे संस्थापक प्रमोद सावंत यांनी २०१० मध्ये सुरू केलेल्या आपल्या जनसंपर्क संस्थेची यशोगाथा सांगितली. तर दुसऱ्या माजी विद्यार्थी डॉ. अमरीन मोगर यांनी युनिव्हर्सल रीच फाउंडेशन या आपल्या स्टार्टअपची यशोगाथा विशद करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ. सुंदर राजदीप यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना नव उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन विविध क्षेत्रांमध्ये आपली क्षमता सिद्ध करण्याचे आवाहन केले.

## पदवी प्रमाणपत्रावरील मराठी (देवनागरी) नावाचा तपशील तपासणीसाठी उपलब्ध

### विद्यार्थ्यांच्या अचूक पदवी प्रमाणपत्रांसाठी विद्यापीठाचा उपक्रम

मुंबई, दि. ०३ डिसेंबर: मुंबई विद्यापीठाचा २०२४ चा दीक्षान्त समारंभ दि. ७ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होणार आहे. यासाठी प्रथम सत्र २०२४ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर मराठी (देवनागरी) नाव अचूक यावे तसेच पदवी प्रमाणपत्रावरील मराठी (देवनागरी) नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी विद्यापीठामार्फत पदवी प्रमाणपत्रांचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जात आहे. पदवी प्रमाणपत्रावरील मराठी (देवनागरी) नाव अचूक असावे तसेच त्यात काही दुरुस्ती असल्यास अशा सर्व दुरुस्त्या करण्यासाठी व पडताळणीसाठी विद्यार्थ्यांचा पदवी प्रमाणपत्राचा तपशील मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर दि. ७ डिसेंबर २०२४ पासून ते १७ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत तपासणी आणि दुरुस्तीसाठी उपलब्ध करून दिला जात आहे. सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांनी दिलेल्या मुदतीत मुंबई विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट देऊन पदवी प्रमाणपत्रावरील मराठीतील (देवनागरी ) नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी तसेच दुरुस्ती असल्यास आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात असे आवाहन विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे यांनी केले आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना आणि महाविद्यालयांना वरील लिंकवरून पदवी प्रमाणपत्रांची माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही किंवा त्यांना महाविद्यालयाचे नाव, विद्यार्थ्यांचे नाव, श्रेणी इत्यादींबाबत काही शंका असल्यास त्यांनी १७ डिसेंबर २०२४ पूर्वी muconvo2024@mu.ac.in या ईमेल आयडीवर ईमेल पाठवण्याचे आवाहनही त्यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेतस्थळावर दि. ७ डिसेंबर २०२४ पासून लिंक कार्यान्वित केली जाणार असून सर्व संबंधितांनी याची नोंद घेण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

## मुंबई विद्यापीठात किरणोत्सर्ग संशोधन क्षेत्रातील संधीचे दालन खुले

### जैवभौतिकशास्त्र विभागातील गॅमा इरॅडिएशन सुविधेचे उद्घाटन – रेडिएशन संशोधन क्षेत्रातील मानाचा तुरा

मुंबई, दि. ०२ डिसेंबरः मुंबई विद्यापीठात किरणोत्सर्ग संशोधन क्षेत्रातील संधीचे नवे दालन खुले करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या जैवभौतिकशास्त्र विभागात असलेल्या गॅमा इरॅडिएशन चेंबर (GIC) 5000, Co-60 चे नुकतेच उद्घाटन करण्यात आले असून रेडिएशन संशोधन क्षेत्रात मानाचा तुरा खोवण्यात आला आहे.



**जैवभौतिकशास्त्र विभागातील गॅमा इरॅडिएशन सुविधेचे उद्घाटन करताना मान्यवर**

भाभा अणुशक्ती केंद्रातील तंत्रज्ञान हस्तांतरण विभागातील माजी प्रमुख पद्मश्री डॉ शरद काळे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, प्रा. मयांक वाहीया आणि प्रा. वर्षा केळकर-माने ह्यांच्या उपस्थितीत या सुविधेचे उदघाटन करण्यात आले. ही सुविधा किरणोत्सर्ग संशोधनाच्या क्षेत्रात मुंबई विद्यापीठासाठी एक महत्त्वाचा टप्पा समजला जात आहे.

या रेडिएशन चेंबरमुळे देशभरातील शैक्षणिक संस्था तसेच संशोधकांसाठी एक मोठे दालन खुले झाले आहे. या मशीनच्या साह्याने आरोग्यसेवा, अन्न प्रक्रिया, साहित्य विज्ञान आणि अभियांत्रिकी, रेडिएशन केमिस्ट्री, बायोलॉजिकल आणि बायोमेडिकल रिसर्च, फूड अँड ॲग्रीकल्चर, स्पेस रिसर्च इ. यासारख्या क्षेत्रांना चालना मिळणार असल्याचे जैवभौतिकशास्त्र विभागाच्या प्रमुख, प्रा. वर्षा केळकर-माने यांनी सांगितले. GIC उदघाटन समारंभाच्या निमित्ताने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस मोठ्या संख्येने विद्यार्थी, संशोधक, व शिक्षक उपस्थित होते. किरणोत्सर्ग आणि किरणोत्सर्ग जीवशास्त्र क्षेत्रातील नामवंत शास्त्रज्ञांनी विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्याचबरोबर काही प्रात्यक्षिके सुद्धा दाखवण्यात आली. या एक दिवसीय कार्यशाळेत कार्यक्रमातील प्रथम वक्ते रेडिएशन कॅन्सर बॉयोलॉजी सेक्शन, बीएआरसीचे विभाग प्रमुख, डॉ.बी.एन. पांडे यांनी रेडिओबायोलॉजी आणि रेडिएशन संरक्षणाचे आरोग्यसेवेत विशेषत: कर्करोगावरील उपचार आणि सुरक्षा पद्धतींमध्ये कसा उपयोग होत आहेत यावर भर दिला. त्यांनी किरणोत्सर्गाच्या अभ्यासासाठी आवश्यक असलेल्या काही मूलभूत गोष्टी, त्याची संरक्षण यंत्रणा, उपचारात्मक क्षमता, इष्टतम मात्र आणि रेडिएशन मुळे होणाऱ्या दुष्परिणामांबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच नैसर्गिक किरणोत्सर्गाचा वैमानिक तसेच फ्रिक्वेंट फ्लायर व अंतराळवीरांवर होणाऱ्या परिणामांविषयी देखील उल्लेख केला. यालाच पूरक असे मार्गदर्शन प्रा.बी.एस. राव यांनी केले. गेली ४० वर्ष रेडिएशन बायोफिजिक्समध्ये कार्यरत असणाऱ्या डॉ. राव यांनी ऑप्टिमायझेशन (ALARA तत्त्व) आणि रेडिएशनच्या मात्रेच्या मर्यादेवर लक्ष केंद्रित करून वैद्यकीय प्रयोगांमध्ये रेडिएशन संरक्षणाच्या तत्त्वांवर भर दिला. त्यांनी नियामक फ्रेमवर्क, रेडिओथेरपी, न्यूक्लियर मेडिसिन आणि रेडिओ डायग्नोस्टिक्स मधील सुरक्षित पद्धती, तसेच गर्भवती महिलांसाठी, कचरा व्यवस्थापनामध्ये आणि आणीबाणी प्रोटोकॉल वर सुद्धा भाष्य केले.

उपस्थितांच्या आग्रहास्तव जैवभौतिकशास्त्र विभाग लवकरच कार्यशाळेचे व चर्चासत्राची मालिका आयोजित करणार असून, किरणोत्सर्गाचा वापर मानवी

कल्याणासाठी कसा करता येईल व त्याबद्दलचे गैरसमज दूर होऊन संशोधनास चालना मिळेल ह्याचा अधिक प्रयत्न करणार असल्याचे विभाग प्रमुख प्रा. वर्षा केळकर-माने यांनी सांगितले.


निर्मिती आणि संपादन:
**जनसंपर्क विभाग**
मुंबई विद्यापीठ

पत्ता:
**मुंबई विद्यापीठ**
एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई -४०००३२

प्रकाशक:
**डॉ. प्रसाद कारंडे**
कुलसचिव

info@mu.ac.in www.mu.ac.in @Uni_Mumbai